९८२६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४४
रा. काव्य ८४३

( सामाजिक खंडकाव्य. )

# सरला-बाला.



REFBK-0003161
REFBK-0003161

गोपाळ लक्ष्मण आपटे.

REFBK-0003161

# आपट्याचें पान.

१

भ्रमरमंडळ—पुणें.

# सरला—बाला.

लेखक—

गोपाळ लक्ष्मण आपटे.

प्रकाशक—

विश्वनाथ गणेश ताम्हणकर.

बुकसेलर, बुधवार पेठ, पुणें.

विजयादशमी शके, १८४८.

किंमत ५ आणे.

काव्य नं.

प्रकाशक—
विश्वनाथ गणेश आणि मंडळी,
पब्लिशर्स, बुधवार पेठ, पुणें.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

मुद्रक—
गोपाळ बळवंत जोशी,
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.

# ओळख.

आमचे 'विद्यार्थी-मित्र' श्री. गोपाळराव आपटे यांचें 'सरला-बाला' हें काव्य प्रसिद्ध करण्याची संधि मिळाल्याबद्दल आम्हांस आनंद होत आहे. श्री. गोपाळराव हे कै. रा. ब. लक्ष्मण जनार्दन आपटे, पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष यांचे कनिष्ट चिरंजीव होत. हे सध्यां ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत आहेत. यांना लेखनाची अत्यंत आवड आहे. 'सरला-बाला' हें खंड-काव्य हा त्यांचा प्रथम प्रयत्न आहे. त्यांची ही लेखनाची आवड उत्तरोत्तर वृद्धिंगत होवो.

**वि. ग. ताम्हणकर.**

माजी शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

# हकीकत.

प्रस्तुत पुस्तक लिहिण्याचे वेळीं जिकडे तिकडे आनंदी आनंद भरला होता. पण तेंच छापून प्रसिद्ध होण्याचें वेळीं जिकडे तिकडें अंधार झाल्यासारखें वाटत आहे. हें पुस्तक लिहिलें फक्त दहा कीं बारा दिवसांत ! पण ते दिवस पूर्ण आनंदी व निष्काळजीचे होते. आणि आतां मात्र जबाबदारीच्या ओझ्याखालीं मनाला, एखाद्या अज्ञात प्रदेशांत पाऊल टाकल्याप्रमाणें, चुकल्या चुकल्या सारखें वाटत आहे. पुढील ओळी माझे परमपूज्य वडील अण्णा यांच्या नजरे-समोरून सहजरीत्या गेल्या होत्या. पण त्या छापून पुस्तक रूपानें आज प्रसिद्ध झाल्या असतां त्या मी आतां कोणास दाखवूं?

पण दैवापुढें काय इलाज आहे? दैवाच्या वाऱ्याबरोबर कोणाच्या संसाराचा वा आयुष्याचा बाजार कसा क्षणांत बदलून जाईल हें सांगणें शक्य नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत सुद्धां एका अबलेच्या दुर्दैवाची अशीच करुण कहाणी रंगवि-ण्याचा प्रयत्न केला आहे.

इन्द्रायणीच्या कांठीं एक लहानसें खेडें आहे. त्यांत सरला व कमलाकर या नांवांचीं दोन समवयस्क, खेळकर, लहानगीं मुलें होतीं. दोघांचीही मातापितरें सुखवस्तु व घरंदाज. बागेंत वा रानांत फुलें तोडावयास जाणें झालें तरी दोघांनीं बरोबरच जावयाचें. नदीवर, शाळेंत, डोंगरावर, कुठेंही झालें तरी सरला आहे तेथें कमलाकर असायचाच. असें दोघांचें लहानपणापासून निष्पाप प्रेम. त्यांचा परस्परांविषयीं असलेला तो निष्पाप लळा पाहून त्यांच्या मातापित्यांनीच काय, पण त्या गांवकऱ्यांनींही त्यांचें लग्न केव्हांच ठरवून टाकलें होतें. पण दैवाच्या वाऱ्यांनें हेलकावे खाणारें हें तारू निराळ्याच दिशेला भडकणार होतें !

बालपणचें रम्य दिवस संपल्यानंतर तारुण्याची नवी झांक दोघांवरही दिसूं लागली. कमलाकर आतां चांगला विशींतला, मिशींतला, तरुण दिसत होता.

त्यांत त्याच्या मनांत मायभूमीच्या विपन्न स्थितीविषयीं नानाप्रकारचे विचार उद्भूत होऊन, देशभक्तीचें जोमदार वारें त्यांच्या अंगांत खेळूं लागलें. तशांत तो एका पत्राचा दुय्यम संपादक झाला. त्याच पत्रांत, प्रचलित राजकारणावर खरमरीत टीका प्रचुर व नोकरशाहीच्या डोळ्यांत झोंबेल असा एक लेख त्यानें लिहिला. अधिकाऱ्यांनीं तो ' राजद्रोही ' म्हणून ठरवून कमलाकरावर पकड–वारंट सोडलें !

कमलाकर, मात्यापित्यांबरोबर बोलत, आपल्या घरांतील ओसरीवरील झोंपाळ्यावर बसला आहे. त्याच्याच लग्नाबद्दल गोष्टी निघाल्या आहेत. इतक्यांत दारांत डगलेवाले वारंट घेऊन तयार ! कमलाकर निघाला. दुःखातिशयानें त्याचे डोळे क्षणभर भरून आले. गांवकऱ्यांना व सरलेला एकवार पाहून बिचारा वाट चालूं लागला. पुढें त्या खटल्यांत त्याला चांगलीच शिक्षा झाली !

त्या शिक्षेच्या कालांत इकडे भयंकर स्थित्यंतर झालें. कमलाकराचा म्हातारा बाप एकाएकीं खचला व मृत्युमुखीं पडला. सरलेचें लग्न, त्याच खेड्यांतील एका रंगेल तरुणाशीं लागलें. दुर्दैवानें तिचेही आईबाप कालवश झाले व तिला ' माहेरचें ' असें कोणीही उरलें नाहीं. ती बिचारी नवऱ्याची नावडती असल्या-मुळें तो तिला मारहाण करून, नानाप्रकारें तिचा छळ करी. इतकेंच नव्हें तर त्यानें घरांत आणून ठेवलेली रखेली सुद्धां, ह्या निष्पाप बालिकेचा घोर उपमर्द करी ! पण दुर्दैवी गाय, करते काय ?

पुढें कमलाकर कैदेंतून सुटून, घरीं येण्यास निघाला. वाटेंतच त्याला सरलेचें लग्न झालेलें समजलें. कर्मधर्मसंयोगानें, त्याच दिवशीं त्याची व सरलेची इन्द्रा-यणीच्या घांटावर गांठ पडली. त्याला, तिचें दुर्दैव पूर्णपणें समजलें. नंतर तो घरीं जातो तों, आनंदातिशयानें त्याची विधवा माता एकदम खालीं पडली व त्याच रात्रीं तीहि बिचारी स्वर्गाची वाट धरती झाली.

आईच्या शवाला अग्निसंस्कार करून कमलाकर जरा तेथेंच बसतो तोंच जवळच्या सुळक्यांवर सरला उभी आहेसें त्याला वाटतें. तो त्या जागीं जाऊन पोहोंचतो तोंच सरला खालीं उडी घालते व हा दुःखाग्नीनें होरपळून गेलेला तरुणही बेभान होऊन तिच्या मागोमागच उडी टाकतो.

असें अगदीं थोडक्यांत, पुढील गोष्टीचें कथानक आहे. नवऱ्यानें ' टाकून ' दिलेल्या, असहाय्य अबलेचें करुण चित्र रंगविण्याचा हा प्रयत्न केला आहे. अशा अबलांकडे नवरेही पाहात नाहींत, व त्या ' सधवा ' असल्यामुळें, समाजही- त्यांच्याविषयीं चिंता बाळगीत नाहीं. खरोखर विधवांपेक्षां अशा सुवासिनी विधवांचें हाल फार कठीण आहेत. अशा दुर्दैवी स्त्रियांना आशेचा तारता हात समाजा- कडून केव्हां मिळतो तें पाहणें आहे. एकादी गोष्ट समाजाच्या नजरेपुढें आणणें हें काम लेखकाचें आहे, पण त्या दृष्टीनें कार्य करण्याची जबाबदारी सर्वस्वीं बहुजनसमाजावरच आहे ! !

मला ही साधी गोष्ट कां लिहावीशी वाटली हें नक्की सांगतां येणार नाहीं; तरी ती लिहिण्यास जें एक तात्पुरतें कारण झालें तें मात्र असें आहे. एके दिवशीं असा दहाच्या सुमाराला रात्रीं मी घरीं परत येत होतों. चांदणें पडलेंच होतें. शांतता मात्र भेसूर पसरली होती. इतक्यांत एका घराच्या दारांतून, एका वीस वर्षाच्या तरुणीला बाहेर ढकलण्यांत आलें. दार बंद झालें. हुंदके माझे कानीं आले. मी तसाच पुढें चालू झालों. घराबाहेर ढकलून दिलेली स्त्री कोण? कुठली? तिला बाहेर कां ढकललें? हें मला अद्यापही समजलें नाहीं. पण त्या प्रकारानें मात्र, मनांत ठरवून टाकलेल्या गोष्टीला चालना मिळून, पुढें फक्त दहाच दिवसांत पुढील सर्व ओळी लिहून तयार झाल्या !

हें पुस्तक आज ज्या मण्डळातर्फे प्रसिद्ध करण्यांत येत आहे, त्या मण्डळा- विषयीं चार शब्द प्रस्तुत प्रस्तावनेंतच सांगितल्यास कांहीं वावगें होणार नाहीं प्रस्तुत मण्डळ, हें एक अज्ञात, गरीब, होतकरू व शारदेची अनन्यभावानें नम्र सेवा करणारें चिमण्या स्वरूपाचें, गोड मण्डळ आहे. यांत बड्या बड्या लेखकांच्या भराऱ्या नाहींत कीं थोर थोर पदवीधरांची भलती भूलही नाहीं. यांत एका विचाराचे, वयाचे, चार पांच उत्साही तरुण आहेत व त्यांच्या उत्साहास थोडेंफार प्रोत्साहन मिळावें म्हणूनच हें पुस्तक आज त्या लहानग्या मण्डळातर्फे प्रसिद्ध करीत आहे. प्रस्तुत मण्डळावर महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखकांचा वरदहस्त आहे, एवढें तूर्त सांगितलें तरी पुरे आहे. मण्डळाबद्दल आणखी कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं.

प्रस्तुत पुस्तक लिहिल्यापासून तों तें प्रसिद्ध होईपर्यंत मला बऱ्याच व्यक्तीचें गोड साह्य झालें. त्यांतल्या त्यांत माझें कवि मित्र रा. गोविंदराव हिंगणेकर व B यांच्या मदतीवांचून तर पुस्तक मुळींच प्रसिद्ध झालें नसतें. या सर्वांच्या ऋणांतून आजच मुक्त होणें कठीण असल्यामुळें, त्यांच्या गोड ऋणांतच राहणें फार बरें.

पुस्तक रसिकांपुढें मांडलेंच आहे. रसिक वर्गाकडून त्याचा योग्य परामर्ष घेतला जाईलच. जांतां जातां त्या सर्वसाक्षी जगन्नियंत्याची नम्र प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करतों.

भ्रमर मंडळ, पुणें<br>
विजयादशमी शके १८४८<br>
ता. १६-१०-१९२६

**गोपाळ लक्ष्मण आपटे.**



गोदूताई

ऊर्फ

कै. सौ. आनंदीबाई जोशी

ईस

सादर समर्पण

गोपाळ.



काढुनि वरती, कमरेवरती, ती घागर ठेवून ।
श्रीसाम्बाच्या मूर्तीजवळीं आली घांट चढून ॥

बालोद्यान प्रेस, पुणें.

दा. क्र. 3989

# सरला-बाला.

नोंद नं. 3२९०
ठाणे

## प्रकरण पहिलें.

### इंद्रायणीच्या कांठांवर !!

संख्या नं. ८८३
ठाणे

झुळझुळ वारा वाहत होता वरती आकाशांत
झाडांमधुनी पक्षी कांहीं होते गाणीं गात
वाऱ्यावरती डोलत होत्या वेली पण फुललेल्या
सडा फुलांचा झाला होता त्या खालीं पडलेल्या
जात्यांवरचीं सुंदर गाणीं कानांवरती घेत
शेतकरीही चालत होते चिलमीच्या गुंगींत
पानांवरती इकडे तिकडे दंव-बिन्दू पडलेले
चमकत ठुमकत आनंदानें होते ते बसलेले
कमरेवरती स्वच्छ घागरी घेउन कांहीं पोरी
तशाच आणिक नदी-कांठला, चालत होत्या नारी
' कुऽऊ कुऽऊ ! ' रव किती कोंबडे आरवती शिवरांत
सभोंवताली होते सगळे आनंदानें डुलत

*　　　*　　　*

इन्द्रायणिचा प्रवाह वाहत होता पुरता संथ
हिरवळीनें भरले होते भोंवतालचे कांठ

सूर्य-फुलांचा नवा फुलारा फुलला होता नुकता
झाडांमधुनी हिंडत वारा गाणें गातच होता
पूर्व-दिशेचें गाल जाहले होते पुरते लाल
कांपत होती मधेंच कोठें कोठें कोमल केल

आणिक लहरी थरथरतांना आदळती कांठाला
कोमल बाला कितीक होत्या पाण्याला जमलेल्या
रवि-किरणांचें सुंदर जाळें होतें झाडांवरती
आणिक कांहीं होते पडले खालीं पाण्यावरती
घागर बुडतां ' बुडबुड ' कांहीं शब्द येतसे कानीं
नवे बुडबुडे नाच नाचती तेथें पाण्यावरुनी
पाण्यावरती किती नाचत्या वाफा नव थंडीच्या
पार विरोनी गेल्या होत्या आतां त्या कायमच्या
झाडें, पानें, फुलें नाचती खुशाल आनंदानें
गाढालिंगन दिधलें होतें, त्यांना कीं वाऱ्यानें

* * *

पालवलेलीं होतीं रानें, रोपें, झाडें वेली
ताम्र-फुलानें किती ठिकाणीं आली होती लाली

शेतांमधुनी वाऱ्यासंगें लाटा थरथरताती
गोड-सुरांचे मंजुळ पांवे कानांवरती येती
कुठें कांपतां शेत बायका कुळवाड्याच्या त्यांत
आनंदानें, गोड सुरानें होत्या गाणें गात
झप् झप् चाले विळा, पदरही तंग काय तो थाट !
वाऱ्यावरती भिर् भिर् उडती केस किती मोकाट

हातांमधलीं किती कांकणें रुणझुणतातीं कांहीं
अंगावरती धूळ उडाली परवा त्याची नाहीं

*   *   *

वेलीवरती कलिका एकच होती त्या रानांत
मुग्ध मनानें वाऱ्यावरती होती नाच करीत
भृंग तिकडुनी डोलत आला गुं गुं शब्द करीत
मिठी मारुनी त्याच कळीला, बसला कांहीं गात
निज–नाथाला बघून झाली गोरीमोरि क्षणांत
चुंबन घेतां, जरा उमलुनी नाचे आनंदांत
पुन्हा उडाला भृंग गुंगुनी अन्य ठिकाणीं कोठें
त्या कलिकेचें हृदय चरकलें, कंठहि सहसा दाटे
नयनांमधुनी टिपें गळालीं बधीर झाला जीव
मुक्त मनानें अश्रु ढाळण्या मिळे तिला मग वांव
दिली टाकुनी तिच्या पतीनें गेलें बुडलें नांव
जगांत झाला–पुरा संपला–निष्फळ आतां जीव
त्या दुःखानें पडली खालीं, खालीं जमिनीवरती
वाऱ्यावरच्या पाचोळ्याचा ढीग जाहला भंवती ! !
किती भृंगही इकडे तिकडे गेले आनंदांत
होता, जो तो पुरा गुंगला परि अपुल्या स्वार्थांत

*   *   *

सोसाट्याच्या वाऱ्यावरती कोलमडोनी खालीं
होत्या कांहीं मुक्या कळ्याही पडलेल्या पायदळीं
खळ्खळ् करती कांहीं ओढे आवेगानें नाद
‘ नदीस जाणें भेटायाला ’ हाच तयांना नाद

किरण फांकुनि उजाडलेलें होतें आतां पुरतें
इकडे तिकडे नाचत होते सगळे चोंहिकडे ते
कितीक पक्षी चाऱ्याकरतां दूर दूर उडताती
पोटासाठीं मुके जीवही घोर कष्ट करिताती

---

## प्रकरण दुसरें.

# सौभाग्यांतील वैधव्य!!

माळावरती उभी राहिली अरडाओरड करुन
गांवामधलीं गुरें आपले टंवकारोनी कान
धूळ उडोनी उंचावरती सोनेरीशी दिसली
कारण होती रवि-किरणावर ती सगळी पडलेली
कानांवरती कोमल पानें ठेवुनि कांहीं पोरी
पाहत होत्या गोपाळांची दुरून गम्मत सारी

*           *           *

देवळांतुनी ' घण्घण् ' घंटा वाजत होत्या कांहीं
सूर त्यांतुनी भक्तिरसाचा कानांवरती येई
डोक्यांवरती मोठ्या पाट्या पिकलेल्या पेरूंच्या
घेउनि जातां, विश्रान्तीस्तव मार्गी थांबायाच्या
पुन्हां आणखी नवत्या नारी, चालू लागायाच्या
जातां जातां खुल्या स्वरानें गाणें त्या गायाच्या

*           *           *

डोंगर–ओळी भरल्या होत्या दाट झाडिनें पुरत्या
नूतन कलिका नव–वेलींच्या तेथें हांसत होत्या
घागर भरुनी घरांस येतां कळ्या, फुलें जमवून
ठेवित होत्या तरुणी कांहीं पदरीं तीं घालून
ठेक्यावरती, कमरेवरची घागर हालत होती
पाण्याचे त्या तुषार कांहीं उडती अंगावरती
चिंब जाहले होते भिजुनी हलते कांहीं पदर
परी तयाची नव्हती कोणां किंचित्शीही कदर

*           *           *

इन्द्रायणिचें वाहत होतें झुळझुळ झुळझुळ पाणी
नव–रंगांच्या छटा पसरल्या होत्या रवि–किरणांनीं
तरंग कांहीं कांपत होते पृष्ठावर पाण्याच्या
आनंदाच्या जणों उर्मि ह्या फुटताती सरितेच्या
हिरव्या हिरव्या बेलाखालीं एक शिवालय होतें
शिखरावरती राघू–मैना सुखांत बसले होते
थर्थर् लहरी कांपत होत्या देव–रावळा भंवती
प्रभु–पायाची जोड मिळाया हृदयीं खळबळताती
सुंदर होता घांट बांधला लहानसा शेजारीं
दगडांवरतीं आदळत होत्या वस्त्रें कांहीं नारी
रविकिरणांची प्रभा फांकली कळसावरि सोनेरी
शिरले होते त्यांतिल कांहीं देवाजीच्या दारीं
आंत जाउनी भिडले होते दोन तीन सांबाला
नमन जणों ते करीत होते भावें प्रभुरायाला

विशाल होती पिण्ड; टांगली वरती घागर हलती
इन्द्रायणिच्या स्वच्छ जलाचे थेंब तयांतुनि पडती
रास जाहली होती वरती हिरव्या बिल्व-दलांची
कुणीं घालतां पाणी, कांहीं वाहुनिही जायाची

*　　　　*　　　　*

नवा फुलोरा रवि-किरणांचा होता सुंदर फुलला
खालींवरती इकडे तिकडे, आनंदें भरलेला
कळसावरचा किरण चमकला कांहीं आनंदून
शिखरावरती, उरले सुरले, दमले मग नाचून
श्रीसाम्बाचें दर्शन घेऊनि आनंदानें डुलत
किरण कोंवळे आंतबाजुला बागडती मौजेंत
आणिक कांहीं खुलवित होते पहा कुणाच्या गालीं !
रंग मजेचा कपोलावरी बाला कुठल्या पडला !

*　　　　*　　　　*

तारुण्याची नवी तरतरी होती मुसमुसलेली
परंतु काया पांडुर थोडी, होती ती सुकलेली
हात जोडुनी भाव-भक्तिनें श्रीसाम्बाच्या पुढती
डोळ्यांमधुनी माणिक मोतीं शालुंकीवर गळती
गालांवरती नाचत किरणें थोडी खेळत होतीं
प्रतनुमनोहर विरल हालती कुंतल वाऱ्यावरती
पावित्र्याचें तेज चकाके प्रेमळ वदनांवरती
कारुण्याच्या करुण रसानें डोळे चमचमताती
सुवर्णकंकण दोन गोजिऱ्या हातीं रुणझुणतात
कांचेचेही बिलवर होते मागें चम्‌चम्‌ करित

करीत होती साम्बावरती अश्रूंचा अभिषेक
एका मागुनि टप्टप् पडती खालीं ते एकेक

*          *          *

ध्यान लागलें ! कसें लागलें ! कुठल्या मूर्तीवरती !
उभी राहिली होती जरि ती त्या श्रीसाम्बापुढती
जरा हांसुनी, डोळे पुसुनी, लागे वांकायाला
कमरेवरती घागर घेउन, लागे चालायाला
घाटावरती येतां, हलके लागे उतरायाला
उंचावरती बराच होता रवि–राणा आलेला
निटिल–प्रांतीं नटली होती कुंकुमाकृती सान
बोलत होती ती तोंडानें प्रेमाचें मधु गान
हाय ! जाहलें काय असें मग !–काय जिव्हारीं बसलें ?
‘ सौभाग्यांतिल वैधव्या ’ चे अनुभव अनुभवलेले !
धुतां धुतांना धुणी बायका थोड्या स्तब्ध जह्याल्या
करुणरसाच्या मूर्तीवरती टक्मक् बघत्या झाल्या
कारुण्याचे अश्रू ढळले नयनींचे ओघळते
सकल जगाला द्रववायाला समर्थसे ओघळ ते
कांहीं पडले पदरांमध्यें कांहीं मग पाण्यांत
कांहीं होते जेथें तेथें अजूनही तरतरत ! !

*          *          *

उभी राहिली कळशी ठेवुनि खालीं दगडावरती
ध्यान लागलें–चित्त रंगलें–कुठल्या मूर्तीवरती !
चित्र चमकलें असेल असलें नयनांपुढती खास
पहिल्या, वहिल्या तिच्या प्रीतिचा झालेला कीं भास

निजनाथाची, प्राणपतीची असेल मूर्ती दिसली
डोळ्यांमध्यें अश्रू जमतां असेल विरुनी गेली
रंजित झाला गालांवरती नव-प्रेमाचा डाव
हृदयामध्यें खळबळ करतो प्रेमाचा कीं भाव
सर ओझरला अश्रूंचा, मग टप्टप् गळती खालीं
त्या जीवाची स्थिती खरोखर केविलवाणी झाली
सरसर धारा दुःखाश्रूंच्या गळल्या खालीं कांहीं
जाब अश्रुंना कधीं कुठेंही मिळावयाचा नाहीं!!

*  *  *

रडुनी, रडुनी झाले होते डोळे पुरते लाल
चित्त-क्षोभें गाल जाहले होते पुरते लाल
वाऱ्यावरती होते नाचत कांहीं कुरळे केस
नव्या फुलांचा त्या वाऱ्यावर दरवळलेला वास
जरा आंवरुनि, घट्ट खोंविला, पदर तिनें बेबंद
अश्रू होते वाहवयाचे झाले थोडे बंद.

*  *  *

हलत्या, झुलत्या पाण्यामध्यें पडलेलें प्रतिबिंब
पालवलेले हलती आतां भोंवतालचे लिम्ब.
आला कळशी घट्ट धरोनी प्रतिबिम्बाचा हात
'बुडबुड' ऐशा आवाजानें भंगियला एकान्त
गेल्या होत्या अतां घरांला घांटावरच्या तरुणी
शेतांमधुनीं गोड सुरांची कानीं येती गाणीं
काढुनि वरती, कमरेवरती, ती घागर ठेवून
श्रीसाम्बाच्या मूर्तीजवळीं आली घांट चढून

पुन्हां भक्तिनें हात जोडुनी बोल बोलुनी कांहीं
डोळे मिटुनी, रम्य मूर्त मग, शांत जराशी होई !

* * *

गुंगुनि गेली सरला बाला कोण्या ठायीं आतां !
कशी जहाली मुकी बिचारी कांहींसें पुटपुटतां !

---

## प्रकरण तिसरें.

## कमलाकर ! !

आला होता डोक्यावती थोडा रवि आकाशीं
मधें मधें तो झगडत होता पांढुरक्या मेघांशीं
हिरवा चाफा, जाइ मोगरा होता पुरता फुलला
सुवास त्यांचा वाऱ्यांवरती होता दरवळलेला
उगीच कोठें कांपत होती करवन्दीची जाळी
फुलें मजेचीं फुललीं होतीं कांहीं हिरवीं पिंवळीं
गुरांमागुनी चालत जातां पुरी गुंगलीं पोरें
कडे भराभर चढून जाती एकामागुनि सारे
जातां जातां फुलें तोडुनी फेकुनि देती खालीं
मुंडाशाच्या वरती कोणी ठेवी उरली सुरली
कुणीं गुंफुनी माळ लाडक्या निज ‘ पवळीला ’ घाली
कुठें थांबतीं नवीं पारडें मनांत जीं बुजलेलीं

इंद्रायणिच्या कांठावरती उंच कडा तुटलेला
जणों वांकुनी पाहत होता अपुल्या प्रतिबिम्बाला !
टोंकावरती, त्या सुळक्याच्या बसला कोणी तरुण
पिंवळें पिंवळें पडलें होतें अंगावरती ऊन.

* * *

तारुण्याची नवी तरतरी झळके अंगावरती
डोळ्यांमध्यें मोहक जादू पुरती भरली होती
सुदृढ अंगीं, झळकत होता धैर्याचा तो भाव
आणिक होती वदनावरती कारुण्याची ठेव
जुना पुराणा शिवरायाचा नसेल ना हा वीर !
शाहिरांनीं खुशाल गावा असला बांका शूर !
तलवारींचें तळपे पाणी त्या सर्वांगावरती
देश-भक्तिची जिवाजिवाची आवड त्याला होती.
वाऱ्यावरती शब्द नादले तरुणाच्या हे भंवती
इन्द्रायणिच्या घुमले कांहीं सुंदर पाण्यावरती

* * *

‘ शूर शिवाजी गेला ! गेला तसाच तो तानाजी
स्वातंत्र्याची देवी झाली रुष्ट अम्हांवर आजी
कडे कपाऱ्या सिंहगडाच्या गेल्या आतां झिजुनी
झर्झर् पाणी दुःखाश्रूंचें गळतें डोळ्यांमधुनी !
कितीक राई जुन्या काळच्या सुंदर मोहरलेल्या
पानें गळुनी दिसती आतां कभिन्न काळ्या काळ्या
तलवारीची चमक रुपेरी कोठें विलया गेली !
बाइल बिजली एक जिभेची मात्र असे उरलेली !

तोरणगडचें तोरण सुटलें शिवरायाच्या मागें
स्वातंत्र्याची चाड कुणाला उरली आतां नलगे ! !
बोलत होता एकसारखा घुमले त्याचे नाद
श्रीसाम्बाच्या भंवती उठले कांहीं मग पडसाद !
‘ आम्ही हिंदू असेच आतां मरावयाचें काय ?
जीव जगविणें हेंही नुसतें लजिरवाणें होय.
‘ धन्य शिवाजी, तो तानाजी ’ हेच सूर गाऊन
काळ कंठणें उरलें आतां उरलेला कीं रडुन ?
प्रतापगडचें विरून गेलें कां शौर्याचें पाणी ?
आटुनि गेले भीमथडीचें दुथडी भरलें पाणी !
जुन्या गडाचे मुके जीवही रडती घटका घटका
गत कीर्तीचा अजून नाहीं बसला आम्हां चटका !

* * *

धर्माखातर विक्रय करुनी गरीबशा अबलांचा
धर्म खरोखर उरला नाहीं कुठेंचही कायमचा !

* * *

सुधारणेचा, पुण्याईचा अंश न कोठें उरला
अनाथ अबला...डोळ्यांदेखत...लागेही झुरणीला ! ”
असेंच कांहीं कांहीं वदुनी खिन्न मनीं तो झाला
चालत आहे धर्म म्हणोनी कारण गोंधळ असला.
देशहिताचें कार्य आपल्या हृदयीं मग ठरवून
इकडे तिकडे बघूं लागला कांहींसें हांसून
नदी कांठचीं कांहीं इवलीं रोपें डोलत होतीं
घाटावरची गडबड आतां शांत जाहली होती

एकसारखे विचार चालत होते त्याच्या चित्तीं
" कितीक विधवा डोळ्यांदेखत हाय! खरोखर मरतीं "
" अरविंदा " नें जसा ठरविला होता निश्चय हृदयीं
तसाच कांहीं ठरवायाचें कामच माझें होई.
'टाकुनि ' तरुणी असती दिधल्या ज्यांच्या म्हणुंनि पतिनीं
कर्तव्याचे नाद घुमविणें आतां त्यांच्या कानीं
'समाज-सेवा ' करावयाचीं, हो हें ठरलें पुरतें "
नयनांमध्यें कारुण्याचें पाणी खेळत होतें
एकाएकी उठला, खालीं लागे चालायाला
शेतांमधला पांवा मंजुळ कानांवरती आला
शेतकऱ्यांचें खड्यासुरावर चालू होतें गान
झाले होते गातां गातां पुरते ते बेभान
घण् घण् घंटा गळ्यांत होत्या कांहीं नाद करीत
सुरांत ज्यांच्या, गाई कांहीं, चालत होत्या चरत
श्रीसाम्बाचें देवालय मग नयनां जेव्हां दिसलें
त्या तरुणाचे पाय त्याकडे निमिषामाजी वळले.
कळसावरती किरण कोंवळें, नाचत आतां होते
गोमुखांतुनी थेंबें थेंबें पाणी टप्टप् टपतें
श्री साम्बाच्या दारामध्यें पोहोंचलाहा तरुण
कार्य ठरवुनी गेला होता तेथें आनंदून.

*　　*　　*

पाउल पडलें होतें एकच उंबरठ्याच्या आंत
चपापुनी तो तसाच राहे, कांहीं आश्चर्यांत!!

---

## प्रकरण चवथें.

# मावळलेलें सुदैव !!

गुंगुनि गेली सरला बाला कोण्या ठायीं आतां !
कशी जाहली मुकी बिचारी, कांहींसें पुटपुटतां !
डोळे होते पुरते मिटले, फडफड करितो पदर
श्रीसाम्बावर चालू होती अश्रूंची ही ! धार
गेला होता, दारांमधुनी येणारा तो किरण
नवा फुलारा फुलझाडांचा गेला कोमेजून !
घाटांवरती, श्रीसाम्बाच्या मन्दिरांतही आणी
तरुणीवांचुनि मुलींच नव्हतें कोठें उरलें कोणी.

*    *    *

इन्द्रायणिच्या सुळक्यांवरती हालत होतें कांहीं
जगाकडे पण त्या तरुणीचें लक्ष लागलें नाहीं.
नयनांपुढती तिच्या चकाके सुंदर असला खेळ
कीं, झालेली होती बागेमध्यें सायंकाळ !
रवि अस्ताला जाउनि तांबुस छटा पसरली होती,
कारंज्याच्या, देवांघरच्या, धारा सळसळताती !
नीट ओळिनें, सुंदर झाडें बागेमध्यें फुललीं
पाणी घालुनि माळी जातां, पानें तीं टवटवलीं
किती ठिकाणीं, वाळूवरतीं ठेवियलेले बाक
सजवित होत्या राजसवेली आणुनि अंगा बांक

अशाच एका बाकावरती तरूण, तरुणी कोणी
आणिक बाळें दोन तयांचीं बसलीं गोजिरवाणीं.
चहोंबाजुला किती पसरल्या होत्या वेली फुलल्या
काळोखानें हलकें हलकें काळ्या काळ्या झाल्या.

सहज कराला सुंदर पुष्पें कितीक लागत होतीं
सुवास त्यांचें मन रिझवाया, तेथें दरवळताती
बागेमध्यें दुसरें कोणी नव्हतें जवळींपास
कारण होती बाग तयांची मालकिची हमखास

चालला असे स्वैर मनानें, ‘ त्यांचा प्रेमळ खेळ ’
त्यांतुनि झाली होती आतां पुरती सायंकाळ !!

*　　　　*　　　　*

रस्त्यांवरती दिवे लागले होते काळोखांत
चाले चुकला गोजिरवाणा पक्षी धडपड करित
बागेमधला तरुण टेंकुनी बसला होता स्वस्थ
मांडीवरती तरुणी ती पण होती निजली स्वस्थ
आनंदाचा खेळ चालला होता त्या बाळांचा
दुडदुड धांवत येउन आइस पापा मधु द्यायाचा
एक लाडका उभा टेंकुनी गाल आइच्या ओष्ठीं
दुसरा चिमणा ! आनंदानें करी बोबड्या गोष्टी
वाटे तरुणां, गालावरचा चिमण्याशा बाळाच्या
निष्पाप असा चाखुनि घ्यावा बहार पावित्र्याचा
जरा वांकला ओठ ठेवण्या चिमण्या गालांवरतीं
वात्सल्याची मोहक जादू कारण तेथें होती.

वळले बाजुस, त्याच क्षणाला, सहसा राजस फूल
त्या तरुणीच्या अधरांवरती वठलें चुंबन खोल!!
मग हास्याची उकळी फुटली दोघां लहानग्यांना
'जम्मत झाली कांहिं तरी' हें असेंच वाटे त्यांना
पुन्हा धांवली तीं दोघेंही त्या तरुणाच्या जवळीं
खेळ असा हा बागेमधला चाले सायंकाळीं!"

*　　　　*　　　　*

नयनांपुढती असा चकाके सोज्वल प्रेमी रंग
होती मुकली ती प्रेमाला! झाली त्यांतच दंग.
जरा रंगुनी...पाय हलविला,...उपडी झाली कळशी
वाहत पाणी क्षणांत गेलें साम्बाच्या पायांशीं!
श्रीसाम्बाला तशा सतीचें सुंदर तीर्थ मिळालें
म्हणुनी कांहीं आनंदाश्रू पिण्डीवरुनी गळले.
अशा सतीचें तीर्थ लाभणें लागे याला दैव
इतरांना परि नद्या-नदांचें पाणी एक सदैव.
तिच्या पतीनें दिलीच होती 'टाकुनि (?)' त्या अबलेला
काळ उलटला, बोल लावणें अथवा कीं नशिबाला
किर्‌किर्‌ मोटा पहिल्या नव्हत्या मुळें वाजत लांबून
पडलें होतें जिकडे तिकडे रखरखलेलें ऊन
मन्दिरामधें गार गारवा, शीतल वारा फार
-होता; परि तें तिचें भडकलें होतें चित्त अपार!

*　　　　*　　　　*

सुदैव, आणिक कळशी, उपडी संगें झाली होतीं
परन्तु नव्हतें यांतिल कांहींही तरुणींच्या चित्तीं

बागेमधला खेळ पाहुनी हृदया चरका बसला
एकच अश्रू चमकत चमकत खालीं पदरीं गळला
जागेपणच्या त्या स्वप्नाचें पुन्हां चमकलें दृश्य
जडलें त्यानें हृदयामध्यें उजाड पण नैराश्य !

" बागेमधला तरुण धरुनी, हातीं लहानग्यांना
मुके पटापट कितीक घेई, तरुणी मुरडी माना !!
' तुम्ही नकाहो घेऊं पापा, घेऊं दे आईला '
मातृ–प्रेमें बाळ त्यांतला एक असें हें वदला.
चुंबन घेई त्या बाळाचें आनंदानें तरुणी
आनंदाचें डोळ्यांमध्यें चमकत होतें पाणी.
युवक पाहतो आनंदानें त्या तरुणीच्या गाली
नजर वांकडी करुनी तरुणी बघते पायांखालीं !
आनंदाचा खेळ चालला होता हा बागेंत
बघतां बघतां अश्रूमाला आल्या एक क्षणांत
केस भराभर बागेमधल्या बाळांचे उडताती
हृदयाखालीं विचार–लहरी इकडे थरथरताती
' कुठलें चुंबन, कुठलीं बाळें ! आतां मजला मिळणें ! ! '
पुटपुटुनी हें वदन जाहलें क्षणांत केविलवाणें
अश्रू–धारा गळूं लागल्या कांहीं मग पदरांत
कांही पडल्या पिण्डीवरती, कांही बिल्व–दलांत
कांहीं आल्या गालांवरती, कांहीं ओंठावरती,
अपुल्या आपण अश्रू–बिन्दू कांहीं कांहीं सुकती ! !

दृश्य लोपलें, बाग निमाली! नव्हती सायंकाळ!
नव्हता कोठें मुळींच आतां उरला प्रेमी खेळ
फुलझाडेंही सुकून गेलीं, गेल्या वेली नव्हत्या
उमलत, उमलत, हंसणाऱ्या त्या कळया कुठेंही नव्हत्या.
नसती बांकें; युवयुवती तर कुठेंच आतां नसती
राजसबाळें गोजिरवाणीं, अश्रूंवरती विरती,
'सळ्सळ् करती झाडांवरचीं पानें तीं जोरानें
वाऱ्यावरती डोलत होतीं भोंवतालचीं रानें
भानावरती येउनि थोडी बघते इकडे तिकडे
तों पडलेलें नयनां दिसलें पाणी तें चोंहिकडे!

* * *

'काय करावं बाई मेला झाला किती उशिर!'
बोलुनि ऐसें घेऊं लागे रिकामीच घागर!
तों पाण्यावर पडला फडकत तरुणीचा त्या पदर
घेई झट्कन्, पिळून टाकुनि क्षणांत अंगावर!
डोक्यावरचें फूल गळालें, पवित्र पिण्डीवरती
आणि त्यामुळें साम्बावरचीं बिल्व–दलें हलताती
कमरेवरती तिनें ठेविली, कळशी उचलुनि, कलती
'असो असें हें फूल!' कांहिंसें ओंठ लाल पुटपुटती!
दचकुनि पाहे मागे, अश्रू अजूनही गळताती
'सरले!!' ऐशी त्या तरुणानें, हांक मारली होती!

---

## प्रकरण पांचवें.

# दुर्दैवी भेट ! !

वळूनि बघतां नयनां दिसलें आश्चर्याचें चित्र
सहजी आला ओठा आडुनि शब्द एक ' कमलाकर ! '
' सरले ! आहे, होय तोच मी ! ' असाच घुमला नाद
हृदयामध्यें पार पोंचली त्या सतिच्या ती साद
आश्चर्यानें ओठ लांबले होते किंचित् दूर
डोळे होते दुःखाश्रूंनीं भरले अपरंपार
कमरेवरच्या कळशीवरती हात टाकला होता
अधरांवरतीं आश्चर्यानें दुजा टेकला होता
हृदय धडाडे आनंदानें अथवा हा ! दुःखानें
कळावयाचें कसें अतां तें ? कुठल्या पण मार्गानें
कमरेवरच्या कळशीवरचा थरथरतो तो हात
अधरावरची करांगुलीही करीत होती सांथ !

*    *    *

कमलाकरही आश्चर्यानें बघून तईं भंवतालीं
उभा राहिला; स्थिती तशाची केविलवाणी झाली.
" सरला घेई हातांमध्यें कां कळशी पाण्याची !
काळ बदलला ! मात जाहली खरोखरी दैवाची !
पाणी भरणें हेंच काम कां तुजला आहे उरलें !
कां, सौख्याचे दिवस चांगले असती आतां सरले ! "

मनांत कांहीं विचार असले क्षणांत त्याच्या आले
हृदय चरकलें; आणिक वदला, ' हाय ! काय हें झालें ! ! '

*　　　　*　　　　*

भानावरति येऊनि कळशी ठेवी भूमीवरती
सर अश्रूंचें डोळ्यांमधुनि कांहींसे ओघळती.
" नशीब माझं फिरलं आहे ! नाहिं आवडत कोणां !
सगळे करती राग अशीही......आहे माझी दैना.
घरांत करुनी काम......असें मग न्यायाचें मज पाणी
दुसरी सटवी चटक चांदणी असे तिकडची राणी
रडूं लागली सरला बाला एकसारखी तेथ
कमलाकरही चाकेत जाहला उभा राहुनी स्वस्थ !
पदर लावुनी डोळ्यांवरती, गंहिवरली ती बाला
ऊर भरोनी, कंठ दाटुनी निमिषामाजी आला.

*　　　　*　　　　*

कळले त्याला स्पष्ट; जाहले होतें जें जें कांहीं
रडूं लागला, दैन्यावस्था बघून कमलाकरही.
तोंड झांकुनी हातांमध्यें उभा राहिला थोडा
देवळांमधे अश्रु-फुलांचा झाला तेव्हांच सडा !
हाय ! जाहले काय असे ह्या दुर्दैवी बालेचें !
खेळ निमाले झाले सरते ! आतां गत प्रेमाचे !
हृदय वाटतें नसेच कांहीं त्या दगडांला पतीला
पती कशाचा ? काळ असे तो दुर्दैवी सरलेचा. "
हात झाडुनी, हें पुटपुटुनी, झाला थोडा शांत
पुढें सतीची उभीच होती सरलेची ती मूर्त.

" सरले ! बाई रडूं नकोगे, झालें तें बघ झालें !
दुर्दैवाचे खेळ आपुले देवा नाहीं दिसले.
हाय, हाय, गं रडूं नको तूं, नको रडूं गं ताई "
शब्दानीं या शान्त परि मुळीं सरला ती नच होई !

° ° °

गेला थोडा काळ ! रडोनी झाली मग ती शान्त
' आला इकडे ' बोले, केंव्हां हो ' कमलाकरपन्त ! '
' झाला आहे एक अठवडा, कैदेंतून सुटून
आलों इकडे सहज आपला, तुला बघाया म्हणुन
नाहीं कोठें दिसलिस, तेंव्हां पहाटेसगे उठुनी
सृष्टीशोभा पहात बसलों होतों कड्यावरोनी
बाबा, आई, अजून असती माझ्यावर रागात
भेटावें कीं नकोच त्यांना, ठरवाया हृदयांत
–बसलों होतों; आलों इकडे सहज दर्शनालागीं
नशिबामध्यें पहावयाचें होतें येथ असें तुजलागीं
लग्न जाहलें तुझें येवढें कळलें होतें मजला
–येतां, येतां; परन्तु नाहीं कळल्या पतिच्या लीला.
सरले ! असती सुदिन आपुले आतां सगळे सरले
झाले गेले नांव बुडाले, जगांत आतां आपुले. "
बोले तेंव्हां भयाण हांसुन, कोमल बाला सरला
सर अश्रूंचा आतां होता थोडासा सुकलेला.
घेऊनि कळशी, बळेंच बोले थोडेंसे ती हंसुन
" येते आतां नातर येतील अंगावर धावून ! "
घाटांवरुनी उतरुनि गेली भरभर ती चालून

दा. क्र.



बुडवुनी घेई पाण्यांमधुनी कळशी पूर्ण भरून.
कमरेवरतीं कळशी घेऊन गेली क्षणांत दूर
भरभर चाले जणों सुटे कीं, वाऱ्यावरचा तीर
तसाच होता निश्चल तेथें कमलाकर पण अजुनी
गेले होते कारण त्याचें भान पूर्ण हरपूनी ! !
सोसाट्याचा वारा होता भण्भण् शब्द करीत
रखरखलेलें ऊन पसरलें होतें दाह करीत
झाडें सगळीं डोलत होतीं ! पानें कांही त्यांची
गर्गर् फिरुनी भूमीवरती डौलानें यायाची

*　　　*　　　*

उभा राहिला कमलाकर त्या घाटावरती अजुनी
डोळ्यांपुढुनी हलली नव्हती त्याच्या मूर्ती करुण
हा ! हें झालें काय, अवस्था भीषण कसली आली !
ह्या अबलेचा उरला नाहीं, कुणी कुणीही वाली
समाजसेवा करावयाचें आहे माझें वचन
आणिक नाहीं हालत सरला मुळींच डोळ्यांपुढुन
‘ कार्य ’ काय तें आहे आतां करणें उरलें एक
या भगिनीचें–या अबलेचें हलकें करणें दुःख !
मग थोडेंसे, पूर्व स्मृतीचें चित्र दिसे नयनाला
त्या तरुणाचा जीव त्याक्षणीं खरा थरकुनि गेला.
इन्द्रायणिच्या पाण्यावरती सोसाट्याचा वारा
करी सारखा, वेड्यावाणी, झडप् घालुनी मारा !
जरा चालुनी गेला जवळीं अंब्याच्या छायेंत
गुंगला असें पूर्व–स्मृतीच्या, चार दोन चित्रांत ! !

## प्रकरण सहावें.

# उडालेले रंग ! !

जरा चालुनी गेला जवळीं अंब्याच्या छायेंत
गुंगला असें पूर्व-स्मृतीच्या ह्या असल्या चित्रांत.

नयनां दिसली, लहापणची लहानगी त्या सरला
खेळ्यांमध्यें होता दुसरा जीवच प्यारा त्याला !

दारांमध्यें लोळत होते, धुळीमाजिं भरलेले
श्वान शेपटी हलवुनि आपुली उगीच होते बसले.

परसामध्यें डोलत होतीं झाडें आनंदानें
आनंदाचें, हलतां हलतां, गाती मंजुळ गाणें
बजरंगाची लहान मूर्ती होती त्या परसांत
लहान देउळ असे बांधलें झोकदार हौसेंत
लहान घंटा आनंदानें होती ती वाजवत
लहान माला गळ्यांत होती हनुमानाच्या रुळत.

* * *

झाडांमधुनी हळूच चोरुन आला होता किरण
छायेंमध्यें खालीं होता पाहात जणुं वांकून !

सुगंध होता दरवळलेला मग वातावरणांत
प्रातःसंध्या आनंदानें बसली मौज करीत.

सरला बाला बसली होती बजरंगाच्या पुढती
गुंफित होती एकेठायीं राजस पुष्पें नवतीं.

कांहीं त्यांतिल असतीं ओलीं बरींच तीं सुकुमार
दंव बिन्दूंचे पडले होते अंगावरति तुषार !
माळ गुंफिली ! केला सुंदर शुभ्र फुलांचा हार
बजरंगाच्या पुढें ठाकली सरला ती सुकुमार
हातांमध्यें विलसत होती माला ती पुष्पांची
' बजरंगाच्या ' तिनें ठरविलें ' गळ्यांत घालायाची.
तोंच वाजली पानें कांहीं गेला मग एकान्त
बघतां वळुनी मागुनि आले तों कमलाकरपन्त.
' माळ गुंफिली, कुणास सरले पण ती घालायाची ? '
' बजरंगाला ठरवियलेले आहे घालायाची ! '
' मी येऊं कां घालायाला माला गं देवाला ?
पुण्याचाही होईल सहजीं लाभ मला गरिबाला ! '
' छेः छेः ! आहे मी केलेली, करा हवी तर दुसरी,
आहे माझी माळ चांगली, माझी मजला प्यारी ! '
' कुठें जाऊनी शोधू आतां मुक्या कळ्या मग सांग
बघ थंडीनें थर्थर्तेना माझें सगळें आंग ! '
हांसुनि किंचित् मग कमलाकर सरले जवळीं गेला
हार गोजिरा, हलके हलके हातीं त्यानें धरला.
' हं घालावी माळ एकदां बाई ही लवकर '
हें प्रेमाचें शब्द थोडके आले कानांवर.
' थांब जराशी...बघ हें पडले...ओहो...हें हें काय !
कमलाकर जों वदला ऐसें, सरला, हलवी पाय !
सरा संभ्रमें माळ जाहली हातांमधुनी सैल
काढुनि घेई कमलाकर मग हातांमधली माळ

गळ्यांत घाली ती सरलेच्या लबाड तो हांसून !
' नको ! नको हें काय ! ' बालिका वदली आनंदून
काढुनि घेई हातांमध्यें गळ्यांतली ती माळ
स्तब्ध राहिली, मुक्या मनानें, किंचित् थोडा काळ.

तों पायाला काय टोंचले तेंच पाहण्याकरितां
जरा वांकुनी, कमलाकरही खालीं पहात होता.
आनंदानें दिली टाकुनी गळ्यांत त्याच्या माळ
हा प्रेमाचा, चालत होता, आनंदानें खेळ !

चार करांही धरिली माला, कमलाकर-सरलेनें
बजरंगाच्या पुढें जरासें झाले आनंदानें
गंभीर आणिक शांत जाहलें भंवतीं वातावरण
बजरंगाच्या गळ्यांत जातां पडली माळ तुटून !
बघूं लागलीं, इकडें तिकडें, दचकुनि दोघें खास
प्रेमाच्या त्या-त्या माळेचा झाला कारण नास.

*　　　*　　　*

' हाय ! हाय ! ती सरला तू नां ! ' वदला मग तो तरुण
भानावरती येउनि भंवतीं नजर जरा टाकून

' माळ तुटे कां कळले आतां पुरते मजला सरले
आनंदाचें दिवस ते गडे, असती आतां सरले ? '
वारा होता सभोंवताली करीत मग थैमान
जरा जाहलें होतें कलतें रवितापाचें मान !
अंब्यावरती चाले कांहीं पक्ष्यांचें मधु गान
सभोंवताली सळ्सळ् करते वाऱ्यासंगें रान.

पुन्हां गुंगला पूर्व स्मृतीच्या लाटेवर भडकून
नयनां दिसली त्या तरुणाच्या चित्रें असली दोन!

*　　*　　*

" दैनिक होते देश–भक्तिचें, नांव तसेंच ' भवानी '
नांव मिळालें गजबजलेल्या कितीक शहरांमधुनी.
' विभव आमुचें ' असा छापला एके दिवशीं लेख
दुय्यम संपादक कमलाकर होता तेंव्हां एक
लिहिला होता देश–भक्तिनें प्रेरित बहु होऊन
आधिकाऱ्यांनीं ठरवियला तो राजद्रोही म्हणुन
स्वातंत्र्याचें उठलें वारें सुंदर त्या लेखांत
स्वतंत्रेची देशभक्तिची आवड होती त्यांत
झाला खटला लेखांवरती थोडक्याच काळांत
लेखकावरि गुदरवियेले दुर्दैवी वारंट.
लेखक होता त्या लेखाचा कमलाकर हा एक
सूड उगवुनि दैव घेतसे, मारुनि असला डंख!
बसला होता आनंदानें तो झोपाळ्यावरती
बाबा, आई, त्याच्यासंगें गोष्टी प्रेमें वदती
" करूं नको हे कम्या! पुन्हां तू लिहूं नको हो लेख
काळ उलटतां, नसतो कोणी आपुला ऐसा एक "
" लग्न करोनी टाकायाचं याचं केंव्हां बाई! '
आनंदानें वात्सल्यानें वदली त्याची आई.
तोंच थडकले दारामध्यें डगलेवाले दोन
वारंटाचा कागद बघतां, झाले सारे दीन.

सारे झाले दीन ! परन्तू ते कमलाकरपन्त
आंतुनि तैसे बाहेरुनिही पुरते होते शान्त !
‘ हाय ! चालला बाळ जाहली क्षणांत सगळी हानी ’
गोंधळ करती बाबा आई त्याचे ऐसें रडुनी
जवळपांसचे लोक धांवले, बाया, पोरें, सारी
सरलाही पण धांवत आली, दुर्दैवीच बिचारी
वृद्ध त्यांतलें ‘ बाबा, आइस ’ करूं लागले शान्त
तरुण जातिचे ‘ धन्य, धन्य, तूं कमलाकर ! हें वदत
–धीर देउनी सरसावोनी, झाले थोडे पुढतीं
तो देखावा बघून, डगलेवाले तेही रडती ! !
जरा चमकुनी, बघूं लागला मागे कमलाकर
कारण झाले होते आतां चित्त तयाचें अधिर.
‘ ती प्रेमाची मूर्त भेटणें, आतां कुठुनी फिरुनी ! ’
मनांत ऐसे म्हणुनी, पाहे किंचित् मागें वळुनी.
सरलाबाला, कांपत होती तेथ हाय भीतीनें
दृष्टी खिळली एकेठायीं, तिची पुऱ्या प्रेमानें !
नजरा भिडल्या, थोडया खिळल्या, अश्रूही ढांसळले,
‘ कमलाकर, वाः भितोस तूं ? ’ हें त्याला कोणीं वदले
रडतां, रडतां, बोले हंसुनी ‘ चला, शिपाई बाबा !
नमस्कार हा गांवकऱ्यांनों ! शेवटला मम घ्यावा. ’
चालू लागे, आनंदानें... आणिक तो दुःखानें
हृदय त्यांतुनी भरलें होतें तेंव्हां करुण–रसानें
गांवकऱ्यांच्या प्रेमळ मूर्ती डोळ्यांपुढती होत्या
बाबा, आई, यांच्या मूर्ती पवित्र रंगत होत्या.

सरलेचे मग डोळ्यांपुढती दिसले रडके डोळे
अंधारानें लगेच झाले, सगळें कभिन्न काळें!!

दुःखाश्रूंचें सर ओझरले वार आकाशांमधुनी
वीज कडाडे, जराचमकुनी, अरडाओरड करुनी!!

* * *

गांवकऱ्यांचे डोळे भरले अश्रूंनीं मग सगळे
ऐकेठायीं, प्रेमरसानें सगळे त्यांतिल जमले.

कांहीं अश्रू कारुण्याचे गळले भूमीवरतीं
देश–भक्तिनें, तरुणांच्या मग नसा, शिरा उडताती.

‘ आहे भेटायाचा आतां कमलाकर हा केव्हां ’
कोणीं वदला, ‘ अगम्य आहे जगदीशाचा केवा ! ’

* * *

‘ हाय ! हाय ! गं सरले सरले ! सौभाग्याचे दिवस ! ’
पुटपुटुनी हें लावी एकच कर आपुल्या नेत्रांस.

* * *

‘ हाय ! हाय ! ती सरला तू नां ? ’ वदला मग तो तरुण
भानांवरती येउनि भंवतीं नजर जरा टाकून

* * *

पुन्हां सरकले नेत्रांपुढतीं तिसरें असलें चित्र
सोसाट्याच्या, वाऱ्यावरचा नाद घुमे सर्वत्र.

° ° °

“ उरली सारी सुटावयाला आतां एकच रात्र,
हृदय परन्तू कितीतरी तें होई हाय ! व्यथित.

इकडे तिकडे चाले, झोंप न येई मुळींच त्याला
सरलेचें तो वदन पाहण्या कितीक उत्सुक झाला.

पहांट झाली, झाली सुटका, सुटला कैदेंतून
आनंदानें कमलाकर मग निघेच त्या तेथून.

दोन काढल्या रात्री, रस्ते लांब लांब चालून
पहांट होतां तिसरी, दिसलें खेडें त्या लांबून
गडबड चाले झाडांवरतीं, भयाण गाणें चाले
इन्द्रायणीच्या पाण्यावरती तरंग कंपित झाले
बसला खालीं विश्रान्तीस्तव एका झाडाखालीं
समोरुनी तों, अंधुक अंधुक आकृति जवळी आली.
' नमस्कार हो, पाटिल बाबा ! ' ' कोण कमळाकर ? '
' हो आहे तो मीच ! ' ' बाबा, बसला इथंच कां रं ? '
आनंदानें भेट जाहली, वार्ता परि दुःखाची
कानांवरती पडली त्याच्या, सरलेच्या लग्नाची
पाटिल बाबा गेले निघुनी ते अपल्या कामाला
हृदय थरथरे ! " कढहि मुके " ते छळती मग हृदयाला.

' भेटायाचें कशास आतां आहे कोणा उरले ? '
बाबा...आई.........................."
अश्रू कांहीं खालीं होते ढळण्याच्या बेतांत
झांकुनि घेई तोंड आपुलें, आपुल्या क्षीण करांत

* * *

' झाले गेले ! जगीं संपलें जीवित आतां माझें '
असें बोलतो न बोलतो तों जवळीं पाऊल वाजे ! "

‘ हाय ! हाय ! ती सरला तू नां ’ वदला मग तो तरुण
भानांवरती येऊनि भंवति नजर जरा टाकून

*         *         *

सीसाव्याचा वारा होता भण्भण् शब्द करीत
आणिक जमले कभिन्न काळे मेघहि आकाशांत
सुरुं जाहला वळीव पाउस मुसळधार कोसळता
क्षणांत गेला, भिजुनी बापुडा कमलाकर तो पुरता
“ माळ तुटे कां कळे अतां तें सगळें मजला सरले
आनंदाचे गोड दिवस ते सरले ! सरले ! सरले !
पुटपुटतां आसवें टपाटप् नयनींची ओघळलीं
आकाशींच्या पाण्यामध्यें कांहीं विरुनि गेलीं.
सूर्य घेऊनि वदन आपलें काळ्या मेघांआड
रडे सारखा, त्या अश्रूंनीं भरल्या विहिरीआड
‘ श्रीसाम्बा ! तूं समाज आमचा केव्हां उद्धरणार ?
दीन दयाळा तोंवर अबला अशाच का झुरणार ’
श्रीसाम्बाच्या मन्दिराकडे नजर जरा वळवून
नमन करूनि गेला अपुल्या घराकडे चालून.

---

## प्रकरण सातवें.

# नशिबाचा बाजार !!

तुरुंगातले कठोर अनुभव होता अनुभवलेला
बाबा, आई ! कोणिच नव्हते आले भेटायाला
हळूंहळूं तो घरांकडे निज मग गेला चालून
मेघांमधुनी आकाशांतील गळती धारा वरुन
रस्त्यांवरुनी ‘ खळखळ ’ पाणी भरभर वाहत होते
अस्मानांतिल मेघहि सगळे गड्गड् करीत होते
पानांवरती जल-बिन्दूंचे होते सर झरलेले
कितीक त्यांतिल हलके, हलके, भूमीवरती गळले.
घरट्यांमध्यें, भलत्यावेळीं, पक्षी होते जमले
उन्हांत तापुनि, अतां थंडिनें कांपत होते सगळे
आला ! आला ! निज-सदनच्या दारीं कमालाकर
आनंदाश्रू चमकत होते, नयनीं अपरंपार !
“ वर्षें झाली पांच पाहुनी हें माझें प्रिय खेडें
वर्षें झाली पांच पाहुनि, ही जिवलग मम झाडें
झाला आहे कितीतरी पण नैसर्गिक हा बदल
जुन्या मनाला, नवी नवाई ! नवलाईचें नवल !!
कोमल कलिका ! सरलाबाला ! होती तेव्हां कैशी ?
दुर्दैवानें केली आहे, हाय ! अतां तिज कैशी !! ”
पुटपुटुनी हें कमलाकर मग गेला उंबरठ्यांत
बाबा, आई, त्यास वाटले, कीं होतीं रागांत.

भरुनी आला कंठ पाहुनी त्याचें पहिलेंच घर
मोल वाटलें त्यास तयाचें स्वर्गाहुनिही थोर
पडला मोठ्या दीन सुखानें ! डोळे स्वस्थ मिटोनी
गोठ्यांमध्यें गुरें पहुडली...शब्द पडे हा कानीं
' कोण पाहिजे ? ' करुण सुरानें आला होता सूर
चित्र चमकलें डोळ्यांपुढती हाय फार भेसूर
नयनां दिसलें सगळें काळें; आली मग अंधारी
तरूण ताठा, पडला खालीं, खालीं ह्या ! धरणिवरी

*　　　*　　　*

जागें होऊनि रडूं लागलें श्वानहिते भेसूर
वठले त्याचे नाद चहुंकडे, होऊनि ते बदसूर
गोठ्यांमधली गुरें फोडती हंबरडा हा हाय !
डोळे करुनी जरा पांढरे मेली त्यांतिल गाय.
परसांमधलें खालीं पडलें आम्रफलाचें झाड
जळूनि गेला, वीज पडोनी जुनाट सुंदर माड !

*　　　*　　　*

उठला थोडी धडपड करुनी, परी पडे तो खालीं
करुणावस्था, दैन्यावस्था, त्या तरुणाची झाली
डोळ्यांपुढुनी अश्रू-धारा, चिखलामध्यें गळती.
डोळ्यांपुढुनी हले मुळीं ना बाबांची गत मूर्ती
' हा ! हे झाले काय ? चालला...गेले...कोठें...बाबा !
भडकुनि बोले, चित्तावरती नव्हता कारण ताबा.
आली मूर्च्छा, पडला खालीं, दिसला भेसुर रंग
चित्र चमकलें असें कांहिसें झाला त्यांतच दंग !

“ बसला होता आनंदानें तो झोपाळ्यावरतीं
बाबा आई, त्याच्यासंगें गोष्टी प्रेमें वदती
‘ करुं नको हे ! कम्या पुन्हां तूं लिहूं नको हो लेख
काळ उलटतां नसतो कोणीं आपुला ऐसा एक ’
‘ लग्न करोनी टाकायाचं याचं केंव्हां बाई ! ’
आनंदानें, वात्सल्यानें वदली त्याची आई.
तोंच थडकले दारांमध्यें डगलेवाले दोन
वारंटाचा कागद बघतां झाले सारे दीन !
दूर एकली उभी राहिली सरला ती भीतीनें
दृष्टी खिळली एकेठायीं तिची पुऱ्या प्रेमानें.
नजरा भिडल्या, थोड्या खिळल्या अश्रूहि ढांसळले
‘ कमलाकर ! वाः भितोस तूं हें त्याला कोणीं वदले !
रडतां, रडतां, हंसला; बोले ‘ चला शिपाई बाबा
नमस्कार हा गांवकऱ्यांनों ! शेवटला मम घ्यावा ! ”

० ० ०

चमकुनि आला, आला थोडा तेंव्हां भानावरती
चढुनी गेला हलके हलके वरती ओटीवरती
तों दृष्टीला दिसली आई, आई ती भेसूर
तोंड झांकुनी वदला, ‘ आई, आहे कमलाकर ! ’

० ० ०

आनंदाश्रू डोळ्यांमध्यें आईच्या क्षणिं जमले
वात्सल्यानें धांवुनि गेली...झालें सगळें काळें.
पडली.खालीं, क्षीण जाहली होती त्याची आई
रुधिर भराभर जखमेमधुनी किती ओघळुनी जाई.

धप्प् वाजले काय पाहण्या करुनी वरती वदन
–बघे; तो पडे रक्तामध्यें भोंवळ त्या येऊन.

*    *    *

झाला जागा, थर्थर् कांपत, उठला थोडा वरती
' रक्त वाहते ' पडले होते त्याच्या अंगावरती
हातावरती घेऊनि माता, गेला माजघरांत
ठेवी हलकें तिला खालती, खालीं अंथरुणांत
जखम बांधुनी बसला हलके ' आईच्या शेजारीं
' आई ! आई ! ' वात्सल्यानें आइस हांका मारी.
हात आपला कपाळावरी ठेवी तो आईच्या
धारा कांहीं गळती डोळ्यांमधुनी दुःखाश्रूंच्या !
वाटे त्याला नको पाहणें कपाळ तें पांढुरकें
' क...मू ! ' ऐसें आई वदली, कमलाकर तें ऐके !
' होय होय ग आई आहे तुझाच कमलाकर
डोळे उघडुनि पहा जराशी थोडेंसेंच समोर. '
डोळे उघडुनि बघूं लागली आई इकडे तिकडे
दुःखामधले आनंदाश्रू, झळकति नयनीं थोडे.

*    *    *

" कमू...बाळा...झाली आहे काय...दशा रे अपुली
उरला नाहीं...आपणासरे...कोणीही बघ वाली ! "
" आई ! आहे मी आतां ग, कोण कशाला व्हावें ?
बाबा गेले...गेलें सगळें !..................."

रात्रीं निजला आईजवळी, झोंप न येइ तयाला
एकसारखे ' बाबा ' दिसती त्याच्या मग नेत्रांला
नाचत होते मेघ अंबरीं, पाऊस नव्हता पडत
' घू घू घू घू ' घुबड कोठुनी होते पण आरडत.
दिवे मिणमिणें रस्त्यांमधुनी होते लुकलुक करित
आणिक कोठें श्वान आरडे, मधेंच होतें रडत.
' उचकी ' आली भयाण एकच मधेंच त्याच्या कानीं
इकडे तिकडे बघूं लागला तो अंधारामधुनी
तोंच लागला रडावयाला मोत्याही दारांत
घाबरला ! कमलाकर उठला भीतीनें थरथरत !
दिवा लावला ! तोंच लोपली दुसरी जीव-ज्योत
गेली आई, तया टाकुनी वरती ती स्वर्गांत.
आंखडलेलीं गात्रें बघुनी क्षणीं फोडि हंबरडा
त्या नादानें थरथरला मग सगळा त्याचा वाडा.
' आई ! आई ! आई ! आई ! गेलिस कोठें बाई '
या नादानें, चिमणें खेडें सगळें हालुनि जाई !
' बाबा गेले आई गेली ! उरलें आतां कोण ? '
याच स्वरानें खेडयाभंवतीं थर थरथरलें तें रान.
शोकरसानें भरले तेथें सगळें वातावरण
शांत कराया आईबाबा, होते आतां कोण ?
अश्रू होते वाहत, यांतें नवल कशाचें होतें
भयाण रात्रीं व्हायाचें हें भलतें ठरलें होतें
चुंबन घेई मृतमातेचें कवटाळोनी तीस
नव्हते उरले त्याचे अश्रू कोणीही पुसण्यास !!

ये शाहीरा ! गायाला तूं असलीं भीषण कवनें
रसवंतीच्या कवे ! जरा तूं गारे असलें गाणें !
घुबडा, गागा ! कानीं पडतां असले हे बदसूर
चिते धडाडा, गा गा बाई मरणाचें तूं सार ! !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय

## प्रकरण आठवें.

# सरलेचें दुर्भाग्य ! !

कमरेवरती, ठेवुनि कळशी गेली अपल्या (?) दारीं
पुढल्या दारांतुनि जाण्याची होती तिजला चोरी
परसांमध्यें पोहोंचली जों झाला गहजब एक
वीज मानवी कोसळली तों अंगावरती एक.
आली स्वारी पतिराजांची धांवुनि अंगावरती
सरला बाला, उभी राहुनी थरथर कांपत होती

*　　　*　　　*

" गेली होतिस कुठें अवदसे ! तूं इतक्यागे वेळ
तुला वाटतो सटवे का हा ? कामाचा ह्या खेळ.
घागर भरुनी आणायाला लागे उशीर कां गे ?
कर्माचें फळ × × अपुल्या भोग आतां तूं भोग ! ! "
कमरेवरतीं लाथ मारुनी गेला निघुनी आंत
पडली खालीं कोमल सरला ! जल आलें निमिषांत
–कळशी मधुनी अंगावरती; झाली पुरती ओली
परी बिचारी, हलकेहलके उठून दारीं गेली ! !

पानें वाढुनि घेऊनि गेली रात्रीं माडीवरती
पतिराजांची मंचकावरी स्वारी पडली होती।
मांडीवरती त्या मांगाच्या ठेवुनि डोकें अपुलें
निजली होती ' गुलाब ' हरहर ! काय दृश्य हें दिसलें ! !
ताटें ठेवुनि टेबलावरी परते जों माघारी
निलाजरी ती गुलाब बोले; लागे तेंच जिव्हारीं !
" सटवे दे तें तस्त आणुनी मजला चूळ भराया "
पतिव्रतेचा डौल कशाला मिरवतेस गे वायां ! "
बोल हें कटु ऐकायाची संवयच हो सरलेला
घोर यातना पतिदेवास्तव सहणें आर्यस्त्रीला !
तस्त नेऊनि तिनें टेविलें, म्हणुनि रखेली उठली
चूळ भरोनी सरलेच्या पण अंगावर फेंकियली.
' वाः वाः ' म्हणुनी पाठ थोपटी गुलाबची पतिराज
कामवासनेपायीं आला होता त्याला माज ! !
सरला बाला, गरिब बापुडी, खालीं येइ बिचारी
प्रकार असला आज हा परी उरीं लागला जहरी

* * *

तशींच पडलीं होतीं भांडीं उरलीं घासायाचीं
तशींच पडलीं होतीं उष्टीं सगळीं काढायाचीं
घांस खाऊनी शिळें थोडकें गेली मग परसांत
पाउस पडण्या आकाशांतुनि झाली तों सुरवात
तशीच लागे भिजल्या भिजल्या भांडीं घासायाला
' मोलावांचुनि मोलकरीणच ' झाली होती सरला

करुनी थोडी झांकपांक मग जरा आडवी झाली
तोंच थडकली पतिराजांची स्वारी ! भडकुनी गेली.
' जरा सांपडे वेळ, तों पडे कमअस्सल ही चोर !
उठल्या बसल्या करते आहे बटीक, भलते थेर.
रात्रींचा स्वयपाक करावा कोणी दुष्टे सांग,
सुचले असती नानापरिचे आतां तुजला ढंग '
हातांमधली सहसा काठीं फेकी अंगावरती
जोरानें ती बसली अगदीं सहसा डोक्यावरती
रक्त भळाळा गळे खालती. अन् गेले पतिराज
आर्य सुपुत्रा ( ? ) गेली आहे कोठें तवरे लाज ! !
उठून लागे स्वयपाकाला, कोमल सरला सरला
'स्वयपाकिणिचा' आर्य-भगिनिनां मान असे तो पहिला.

*           *           *

रात्रीं निजली कांबळ्यावरी गरिब बिचारी गाय
अंगावरती वस्त्र नसे धड ! स्थिती काय ही हाय ! !
झोंप न येई मुक्या जिवाला, चित्रें असलीं दिसलीं
" कीं, चाले ती रानांमधुनी सुंदर प्रातःकाळीं
वेली होत्या बहरुनि गेल्या कोमलशा पुष्पांनीं
कळ्या फुलांचा सडा जाहला होता निर्जन रानीं.
जवळच ओढा, गान गाऊनी खळ्खळ् वाहात होता
ओढ्यामधला खडक पांढरा वरती आला होता !
बसे जाऊनी सरला, पुष्पें वेंचुनि निज पदरांत
खडकांवरती येउनि लहरी निघुनि जाति निमिषांत

उडे त्यांतला तुषार सहसा सुरम्य, मोहक गालीं
गालासरशीं, पूर्व-दिशेला आली थोडी लाली.
हळूच टाकी पाण्यावरती एकादें तीं फूल
गर्‌गर् गिरक्या घेऊनि जाई क्षणांत ते बहु दूर.
शेवाळेंही डोलत होतें त्या ओढ्याच्या कांठीं
...तोंच थडकली लाट; आणखी होती त्यांतुनि मोठी.
खडक बुडाला ! बुडली सरला ! पुष्पें सगळीं बुडलीं !
गार गार त्या पाण्यानें ती पुरी कांकडुनि गेली
पश्चात्तापें मनीं पोळला कुणी एक मग तरुण
गेला तिजला करीं घेऊनी, रानीं कांठावरुन
भानांवरती आली, बसली सरला थोडी खालीं
तरुण तो कुणी, बसे खालती, हळुच तियेच्या जवळी
' सरले ! सरले ! त्रास तुज दिला क्षमा करी गे मजला '
हांसुनि थोडे, पश्चात्तापें लागे बोलायाला
' सरले, केली चूक देऊनी तुला अहर्निश त्रास
भलत्या नादीं लागुनि केला, खरोखरी तव नास
पति-पत्नीचें नातें होतों अगदीं विसरुनि गेलों
कर्तव्यातें विसरुनि पुरता सरले ! अंध जहालों !
क्षमा करी गे ! स्वर्ग-देवते ! एकवार तूं मजशीं
दिव्य अप्सरे ! जिवाचें परी ! प्रसन्न कां नच होसी !
बोलेनि हें तरुण वांकला धरावयाला पाय
तोंच थोडकें, गोड हांसुनी, सरला बोले " काय
-करावयाचें असलें बाई ! झालें तें तें झालें
नशीब माझें फुटकें म्हणुनी, व्हायाचें तें झालें !

आहे आतां सुदैव माझें !...वागायाच नीट "
बोले सरला असें त्याकडे दृष्टी लावुनि थेट.

* * *

' घालूंदे हें फूल आपल्या जणुं प्रेमाची खूण '
सरसावोनी बोले तेव्हां, थोडें हांसुनि तरुण.
फूल खोवितां केसांवरती थरथरला तो हात
सरलेचेंही नव्यादमानें थरथरलें मग चित्त ! "

* * *

जात्यावरचें डोकें पडलें झोपेमाजीं खालीं
परन्तु वाटे स्वप्नांमध्यें फूल कीं कुणीं घाली.
जात्यावरती डोकें टेंकुनि होती ती निजलेली
पडतां खालीं; त्या धक्क्यानें क्षणांत जागी झाली.
नयनां दिसलें, पुन्हां गुंगतां असलें दुसरें चित्र
" भरलें होतें कीं पाण्यानें इन्द्रायणिचें पात्र
घाटांवरती खेडवळांची कितीक गर्दी झाली
गुरें आपली, कुणी गुराखी पाण्यामध्यें घाली.
श्रीसाम्बाच्या मन्दिरामधें नव्हते तिसरें कोणी
परन्तु होता तरुण आणखी दुसरी होती तरुणी
पावित्र्याचें तेज चकाके दोन्ही वदनांवरती
आणिक होती अंगावरती तारुण्याची कान्ती
साम्बा पुढती हात जोडले होते ते भक्तीनें
तरुण त्यांतला बोले ऐसें प्रणयी प्रेमभरानें
' श्रीसाम्बाच्या पुण्यपदांना आठवुनीया भावें
जें बोल ते सरले आतां भक्तीनें ऐकावें

पति-पत्नीचें भावी नातें नाहीं विसरायाचा
वेध तुझा गे नाहीं माझ्या मनास सोडायाचा '
बोलुनि हें तो तरुण वांकला हांसत हांसत खालीं
साम्बावरचीं बिल्वदळें मग करें कांहिशी उचली
डोक्यावरती सरलेच्या तीं लागे ठेवायाला
तोंच वांकली, कशास नकळे, थोडी सरला बाला !
त्या तरुणाचा हात घांसुनी गेला कुंकुम तिलक
चमकुनि तरुणी कपाळावरी ठेवी हातच एक ! !
तोंच वाजवी देव-द्वारीं घंटा मधुर रवानें

* * *

माडीवरती गजर चालला होता परि जोरानें
जागी झाली उठूनि बसली, अश्रूहि ढांसळले
रडण्या वांचुनि, आतां कांहीं नव्हते नशिबीं उरलें
भयाण होती किती शांतता तेथें पसरुनि गेली
कानांवरती-हृदयविदारक अन् किंकाळी आली
कोण रडे हें ? कशास ? लागे विचार हा करण्याला
परन्तु नाहीं कांहीं कळलें, दुर्दैवी जीवाला !

* * *

रातकिड्यांचें भीषण गाणें चाले शेतांमधुनी
मेघांनीं वर अंबर आलें होत अगदीं भरुनी
केर काढुनी; परसांमधल्या गेली तुळशीपुढती
रांगोळीच्या विविध आकृती काढी सुंदर मूर्ती
फुलें उमलुनी झाडांवरती हांसत होतीं कांहीं
खालीं कांहीं गळुनी; कोठें ढीग तयांचा होई

गाणें गाई स्वैर–स्फूर्तिनें सरला; पसरे नाद
वातावरणहि भरून गेलें, गोड स्वरानें तेथ
आनंदानें डोलूं लागे, निसर्गही भंवतालीं
आनंदानें बहरुनि गेल्या कांहीं चिमण्या वेली
त्या गाण्याला सांथ कराया गाती कांहीं मेघ
झाडांमधुनी जातां जातां, पवन आळवी राग

*　　*　　*

गड्‌गड् वाजे वरती; वरती बघावयाला लागे
मेघांमधल्या फटीमधोनी एक चांदणी झळके
‘ काय, बिचारी पतिविरहानें असेल दुःखी झाली ’
असें कांहिंसे सरला बाला बोलुनि गुंग जहाली
तोंच कडकडा पडली खालीं अस्मानांतिल राणी ! !
तोंच ठरवुनी विचार कांहीं, उठली ती ही तरुणी.

---

## प्रकरण नववें.

# मृत्यूच्या जबड्यांत ! !

दळावयाला दळण लागली, घरांत ती जाऊन
बसली होती पाय आपला अदबीनें पसरून
भांड्यांमध्यें किती जोंधळा होता दळावयाचा
हलके हलके मुठभर त्यांतिल जात्यावर जायाचा.

*　　*　　*

" सायंकाळीं गेला होता रविराणा-अस्ताला
शीतल वारा पितृ-दिशेचा लागे वहावयाला
निर्जन रानीं झाला होता भीषण अंधःकार
उभी राहिली होती कोणी तेथें नवती नार !
झाडांमधुनी उजेड थोडा, खालीं पडला होता
बांधा, त्यांतुनि त्या तरुणीचा सुंदर झळकत होता
कुंकुमाकृती भालप्रदेशीं सान असे नटलेली
पांडुर वस्त्रें अंगावरती होती तरुणी ल्याली
रचली होती चिता, पेटवी तरुणी आनंदात
दुःखांमधले आनंदाश्रू नयनीं होते डुलत
' देवा ! ठेवी सुखी, दयाळा ! तिकडे आनंदात !'
उडी झोंकुनी जाळांमध्यें देई हें पुटपुटत "

* * *

सरलेच्या हें नयनां दिसलें ओझरतें कटु चित्र
सर ओझरले डोळयांमधुनी अश्रूंचे अनिवार
हात थरथरे ! चित्त बावरे ! अबलेंचें त्या पुरतें
दळावयाचें अतां जोंधळें झाले होते सरते.
पदर बांधुनि, कमरेवरती कळशी मग घेऊन
इन्द्राणीच्या घांटावरती गेली ती चालून !!

* * *

किलूबिल् करुनी, कांहीं पक्षी चारा आणायाला
दूर उडोनी उंचावरती; गेले त्या समयाला !!
उषा हांसली, पूर्व-दिशेच्या होती गालीं लाली
मधेंच लहरी पाण्यावरती किंचित् कंपित झाली

इन्द्राणीच्या कांठावरती, देवापासुन दूर
–दो हाकांवर स्मशान होतें, जुनाट पूर्वापार
चिता पेटली होती तेथें; झाडांवरती गात
पक्षी कांहीं बसले होते चिमणे, आनंदांत !
कळशी टेवुनि पायरीवरी, गेली सरळ जलांत
ओलेत्यानें तशीच आली ती देव–द्वारांत.
नमन करोनी श्रीसाम्बाला परते दारांतून
तशीच गेली पल्याडल्या त्या सुळक्यावरि चालुन
इन्द्रायणिचें पाणी होतें पूर्ण अतां चढलेले
कारण होते वळीव पाऊस गत–रात्रीं पडलेले.

*　　　*　　　*

ओलेत्यानें तशीच गेली सरला सुळक्यावरती
हात जोडुनी, तोंडानें ती कांहीं बोलत होती !

*　　　*　　　*

‘ घातलेंस तूं मला कशाला देवा ! या जन्माला
हेतू होता, त्यांत कोणता, सांगा दीनदयाळा !
खेळुनि खेळुनि अबलांचा तूं घेसि असा कां प्राण ?
जगावयाचें जगीं कशाला ? जाता असुचा त्राण !
गेले बाबा, गेली आई, गेलें हें सर्वस्व
गेले आतां पुरते बुडले जगामधूनी नांव !
‘ इन्द्रायणिच्या कांठावरती खेळाला म्यां यावें
श्रीसाम्बाला नमन करोनी भक्तीनें परतावें ’
बालपणीचा रम्यकाल तो असाच गेला येथ
परन्तु आतां काय राहिले ? गेली ! बुजली वाट

रानामधलीं सुबक फुलें मी तोडुनी तीं न्यायाची
वाटेमध्यें बसुनी कोठें हारहि गुंफायाची.
कधीं जाहला उशीर मजला तर बाबा यायाचे
काळोखांतुनि नीट घराला, जरून मज न्यायाचे !
हार गुंफितां, येति कितीदां मम कमलाकरपन्त
जवळीं माझ्या आनंदानें बसती कांहीं गात !
किंवा थोडीं फुलें खुडाया करीत मजला मदत
निर्जन रानीं कितीक वेळां दाविति मजला वाट
किंवा गजरा गुंफुनि माझ्या खोंविति ते वेणींत
दूर भराभर मधेंच कोठें, तसेंच निघूनी जात
' आई ! मजला रागें भरतां येऊनि घांटावरती
कितीक वेळां असेन बसले! गेली वेळ अतां ती ! !
मग यायाचे धांवत धांवत कमलाकर कोठून
गोड बोलुनी मग न्यायाचे मजसी समजावून

* * *

खेळायाचे भातुकलीचे कितीक आम्ही खेळ
संसारहि तो विरावयाचा होता सायंकाळ
' सलले, होईन तुधाच नवला! मी ग कमलाकल '
गोड स्वरानें बोलायाचे, गेला आतां खेळ !
बालपणींची अल्लड मूर्ती दिसते माझी मजला
बालपणींचे कमलाकरही दिसताती नयनांला ! !
' खरंच जोडा काय शोभतो सुंदर हा गं बाई ! '
शेजाऱ्यांचा बोल हा असा कानांवरती येई.

बालपणींचें अल्लड वारें सरतां मग शाळेला
–दोघें आम्ही सवेंच गेलों पार न आनंदाला !
' वा: वा: ! आहे काय पोर पण; वा:रे कमलाकर '
असें बोलुनी पंतोजी ही हंसावयाचे फार !
' आहे झालं अपली सरला ! ' वदतां कोणी केंव्हां
रागानें मग कमलाकरही गोरामोरा व्हावा.

*　　　　*　　　　*

त्यांचे बाबा किती बोलती येऊनि ते मजपाशीं
' सरले बाई ! लग्न करी गं आमच्या कमुबाळाशीं
चुकून येतां घरीं आमच्या मम कमलाकरपन्त
पदर धरोनी, धोतरासवें, देई कोणी गांठ !

*　　　　*　　　　*

गेले ! गेले ! दिवस मजेचे ! उरले हे दु:खाचे !
आतां उरलें एकच हातीं आहे रडावयाचें.
आनंदाचा काळ संपला एक उरे दु:खाचा
खेळ संपला, पहिल्या वहिल्या अवघ्या त्या प्रेमाचा. "

*　　　　*　　　　*

असें बोलुनी पदरावरतीं गाळी अश्रू दोन
बघूं लागली पाण्यावरती वांकवुनीया मान
वाहत होतें गढूळ पाणी सरितेचें वेगानें
जणों गातसे गान मनीं ती अपल्या, आनंदानें
भरभरभोरें कांहीं होते पाण्यावरती डुलत
पानें, फांद्या त्यांत जाऊनी–होत्या कोठें जात !!

किरण कोवळे पूर्व-कडुनी होते वरती येत
झणूझण् वारा वाहात होता वरतीं अस्मानांत
शेतकरीही चालत होते अपापल्या नादांत
जळतच होती चिता एकली जळती मसणवाटींत
गुरें घेऊनी किती गुराखी गात जाति कुरणांत
गजबज होती सुरू जाहली चिमण्याशा खेड्यांत!!

*　　*　　*

“ श्रीसाम्बा घे शेवटचें हें तुजला माझें नमन
सरिते घे गं पोटामध्यें मजला आनंदानं
बाबा! आई! कमलेताई! आले भेटायाला
योग्य नसे मी तुम्हां टाकुनी जगतीं रहावयाला
घ्या पक्ष्यांनों! रान-फुलांनों! शेवटचें हें नमन
जित्या जगाला जाते आहे हो सरला सोडून
श्रीसाम्बा! तूं ठेवों तिकडे अगदीं आनंदांत
कालवावयाची मी नाहीं माती त्या सौख्यांत!”

*　　*　　*

पुटपुटनीं हें, पदर बांधुनी, चाले पाऊल एक
उडी घातली; तो कानांवर आली मागुनि हांक!
गेली बुडली पाण्यामध्यें अजाण अबला सरला
सुळक्यावरती दुर्दैवानें कमलाकर तों आला
कमलाकरही इन्द्रायणिच्या गेला त्या पाण्यांत
सुळक्यावरुनी उडी घालुनी खालीं त्याच क्षणांत!

*　　*

---

REFBK-0003161
REFBK-0003161

# उपसंहार ! !

सहजच गेली नजर तयाची स्मशानांतुनी तिकडे
सरला बाला ओलेत्यानें चालुनि गेली जिकडे !

क्षणीं काय तें उमजुनि चुकला तो कमलाकरपन्त
चिता आइची जवळ जवळ ती झाली होती शान्त


तसाच गेला धांवत, धरुनी त्याच कड्याचा रोंख
उडी घातली परि सरलेनें, हा जो मारी हांक ! !

विचार कसला ? भान कुणाला ? तसाच जाई आंत
अन् नशिबानें अतां मात्र त्या तिचा सांपडे हात !

आनंदाश्रू त्या दोघांच्या डोळ्यांमधुनी ढळले
काळदरीच्या पाण्यांमध्यें परि तें कायम विरले ! ! !

झुळझुळ वारा वाहत होता वरती आकाशांत
झाडांमधुनी पक्षी कांहीं होते गाणीं गात-

वाऱ्यावरती डोलत होत्या वेली पण फुलेलल्या
सडा फुलांचा झाला होता त्या खालीं पडलेल्या.



# आधुनिक काव्य–ग्रंथ.

| | | आणे. |
|---|---|---|
| किरण | ... ... ... | ४ |
| उषा | ... ... ... | १२ |
| शलाका | ... ... ... | रु. १ |
| अभागी कमल | ... ... ... | १२ |
| विरह–तरंग | ( माधव ज्यूलियन् ) ... | ८ |
| वीणा–झंकार | ... ... ... | ८ |
| बालकाव्य–लहरी | ... ... ... | २ |
| दख्खनचा वीर | ( हिंगणेकर ) ... ... | ६ |
| काव्यकुंज | ,, ... ... | ४ |
| दोन नवीन काव्यें | ( आपटे व हिंगणेकर ) ... | ४ |
| सरला–बाला | ( गो. ल. आपटे ) ... | ५ |
| कुंदाच्या कळया | ... ... ... | ४ |
| निर्झर नाद | ... ... | ( छापत आहे. ) |
| कला ( गिरीश ) | ... ... | ( छापत आहे. ) |
| आंबराइ ( गिरीश ) | ... ... | ( छापत आहे. ) |

विश्वनाथ गणेश आणि मंडळी, पुणें.